MHGA040003172025

दाखल तारीख : ०९.०५.२०२५
नोंदणी तारीख : ०९.०५.२०२५
निकाल तारीख : ०४.०५.२०२६
कालावधी : ००वर्ष, ११म.,२५दि.

**नि.क्र.२१**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०४/०५/२०२६)**<br>**नि.फौ.मा.क्र.३९/२०२५** |
| | अपराध क्र. :१०६/२०२५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **आरोपी** | **पंकज भारत डोंगरवार,**<br>वय २९ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. मांगदा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपीचे विधिज्ञ श्री तागडे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २०.०३.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | २०.०३.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | ०९.०५.२०२५ |
| दोषारोप तयार करण्याची तारीख | २७.०६.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २५.०३.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## आरोपीचा तपशिल

| क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु.सं. च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पंकज भारत डोंगरवार | कलम ३५(३) भा.न्या.सु. सं. सुचनापत्र दिले. | ११८(१) भा.न्या.सं. | निर्दोष | नाही | काही नाही |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०४ मे, २०२६ रोजी घोषित)

आरोपीवर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) अन्वये दंडनिय अपराधांकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाचे कथन** :-

२. फिर्यादी सुरज अरुण कोसरे हा दि.२०.०३.२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता गौरव बावणे, अंकालु मडावी, लोमेश लाडे, पंकज डोंगरवार व इतर लोकांसोबत तुळशिदास काशिकर याचे ट्रॅक्टरवर बसुन ओमेश्वर काशिकर याचे लग्न असल्याने लग्न मंडपाकरीता जंगलातुन मांडव डेरी, बांबु आणण्याकरीता मांगदा जंगल शिवरात गेले व बांबु तोडत असतांना ट्रॅक्टर जवळ आरोपी याने फिर्यादीला जवळ बोलाविले व आरोपीने दारुच्या नशेत फिर्यादीला म्हणाला की, फिर्यादीने आरोपीचे बहिणीला मोबाईल वापरण्या दिला आरोप करुन फिर्यादीला कुऱ्हाडीने मारतांना त्याची कुऱ्हाड ट्रॅक्टरचे पल्याला अडकुन उसळली व फिर्यादीचे पाठीमागे डाव्या खांद्याचे खाली लागली. त्यामुळे फिर्यादीला जखम होऊन रक्त निघत होते. त्यावेळी सोबत असलेला गौरव बावणे हा फिर्यादी जवळ आला व भांडण सोडविले. त्यानंतर गौरवने वेणुनाथ बावणेला फोन करुन मोटारसायकल घेऊन बोलाविले. त्यानंतर फिर्यादीला वेणुनाथ बावणे व गौरव बावणने गावात परत आणले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन, आरमोरीला तोंडी रिपोर्ट दिली. सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द अपराध क्र.१०६/२०२५, कलम ११८(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर प्रकरणाचा तपास पो.उपनि. दिलीप मोहुर्ले यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांची बयाणे नोंदविली, घटनास्थळ पंचनामा केला व आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. या न्यायालयाने आरोपी विरुध्द नि.क्र.८ वर भा.न्या.सं.चे कलम ११८(१) अन्वये दोषारोप ठेवले. दोषारोपातील आरोप आरोपीला वाचुन व समजावुन

सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा कबूल नाही असे नि.क्र.९ वर सांगितले आणि संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. आरोपी विरुध्दचा आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले. आरोपी विरुध्द काहीही न आल्याने त्यांचे कलम ३५१(१)(ब) भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे बयाण नोंदविण्यात आले नाही. आरोपीने त्याच्या बचावाकरीता कोणतेही पुरावे सादर केलेले नाही.

४. वरील विवेचनावरुन खोलील मुद्दे माझे समोर उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं दि.२०.०३.२०२५ रोजी १३.०० ते १३.१५ वाजताचे दरम्यान मौजा मांगदा, ता. आरमोरी येथील जंगल परिसरात आरोपीने फिर्यादी सुरज अरुण कोसारे याचे पाठीमागे डाव्या खांद्याचे खाली कुऱ्हाडीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपीने कलम **११८(१)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष** :-

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | सुरज अरुण कोसरे | १९ | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर** :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर** :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. फिर्यादी :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब. बचाव :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. भौतीक वस्तु :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

.................................................................................................................

## मुद्दा क्र.१ व २ :-

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द कथन सिद्ध करण्यासाठी फिर्यादी सुरज कोसरे (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, घटना दि.२०.०३.२०२५ रोजी घडली होती. आरोपी आणि तो जंगलात बांबु आणण्याकरीता गेले होते, तेव्हा त्यांचा वाद झाला. त्यामुळे फिर्यादीने रागाच्या भरात पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. परंतु त्याने रिपोर्ट मधील मजकुर नाकारला. त्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा उलटतपास घेतला असता त्याने मान्य केले की, त्याचा आरोपी सोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे व त्याला सदर प्रकरण चालवायचे नाही.

६. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादी सुरज (सा.क्र.१) याला आरोपीने कुऱ्हाडीने पाठीमागे डाव्या खांद्याच्या खाली मारले याबाबत काहीही आलेले नाही. फिर्यादी हा जखमी साक्षीदार आहे व त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. अभिलेखावर दाखल पुरसिस नि.क्र.१८ मध्ये फिर्यादीने नमुद केले आहे की, त्याचा आरोपी सोबत आपसी समझोता झाला आहे व त्याला आरोपी विरुध्द प्रकरण चालवायचे नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन आरोपीने सदर गुन्हा केला हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिद्ध करु शकले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देण्यात

येतो. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी नामे **पंकज भारत डोंगरवार** याला भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१) अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. जप्त एक कुऱ्हाड अपिल कालावधी संपल्यानंतर लिलावात विक्री करुन आलेली रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र आणि जामिन बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) अन्वये रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक व जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.04 17:30:11 +0530

स्थळ : आरमोरी
दि.०४.०५.२०२६

(श्रीमती व्ही. व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी